
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
संपादक - दिपक थोरात
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -७८ | गुरूवार दि.०७ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -78 | THURSDAY DT.07 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



## गेवराईत विद्युत तारेचा शॉक लागून कामगाराचा मृत्यू

गेवराई । प्रतिनिधी

भंगारची गाडी भरताना विद्युत खांबावरील तारेला अचानक हात लागल्याने एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. गेवराई येथील मोंढा नाका परिसरात (दि.६) सायंकाळी ही घटना घडली. मोमिन नय्युम (वय ४५) असे या कामगाराचे नाव आहे. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी, गेवराई शहरातील मोंढा परिसरात मोमिन नय्युम व शेख रीजवान हे दोघे एका भंगार दुकानावर काम करीत होते. यावेळी भंगाराची गाडी भरताना दोघांनाही विद्युत तारेचा जोराचा झटका बसला. यामध्ये मोमीन नय्युम यांचा जागीच मृत्यू झाला तर शेख रीजवान हे गंभीर जखमी झाले. शेख यांना पुढील उपचारासाठी बीड येथे हलविण्यात आले आहे.

# मलिकांवरुन जुंपली

## 'देशद्रोही'वरुन सत्ताधारी विरोधकांमध्ये खडाजंगी; सभागृहात काय घडलं?





नागपूर : राज्याच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपुरमध्ये सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. या वादाचे कारण ठरले राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक. नवाब मलिकांनी अजित पवार गटाला पाठिंबा दर्शवत सत्ताधारी बाकावर बसले. याच मुद्द्यावरुन ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. दानवेंच्या या आरोपांवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जोरदार प्रत्यूत्तर दिले.

आजच्या कामकाजात अंबादास दानवे यांनी नवाब मलिकांवरुन देवेंद्र फडणवीसांना घेरण्याचा प्रयत्न केला. एक सभासद सभागृहात शेवटच्या बाकावर बसले आहेत. त्यांच्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी वारंवार देशद्रोह्याच्या मांडीला मांडी लावून बसणार नाही, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे आता त्यांची काय भूमिका आहे, हे कळायला पाहिजे, असे अंबादास दानवे म्हणाले. दानवेंच्या या वक्तव्यानंतर सत्ताधारी- विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

फडणवीसांचे सडेतोड उत्तर...

दानवेंच्या या प्रश्नांवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋब्रवर्पींळी) यांनीही जोरदार प्रत्यूत्तर दिले. 'नवाब मलिक जेलमध्ये असताना त्यांना मंत्रीपदावरुन का काढलं नाही? याचे उत्तर द्या,' मग बोला असे फडणीस यावेळी म्हणाले. तसेच आम्ही कोणाच्याही मांडीला मांडी लावून बसलो नाही. मी आणि मुख्यमंत्री मांडीला मांडी लावून बसलोय. आमच्या मांडीला मांडी लावून अजित पवार बसलेत.. असेही फडणवीस यावेळी म्हणाले.सुषमा अंधारेंचा खोचक टोला

दरम्यान, नवाब मलिक यांच्या सरकारला दिलेल्या पाठिंब्यानंतर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. पूजा चव्हाणचा बलात्कार करून हत्या केल्याचे आरोप संजय राठोड यांच्यावर भाजपने केले. त्याच संजय राठोडांना मंत्रिमंडळाच्या पंगतीला बसवून घेतले आणि तेच फडणवीस आज नवाब मलिक यांचे मंत्रिपद का काढून घेतले नव्हते असा प्रश्न विचारतात? देवेंद्र भाऊ सरडा आत्महत्या करेल असा घणाघात त्यांनी केला.

# जयदत (अण्णा) क्षिरसागर बीड जिल्ह्यातील विकासाचा केंद्रबिंदू



## मोडलेल्या माणसांचे दःख ओले झेलताना

त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना कोणती ना जात ज्यांची कोणता न धर्म ज्यांना द:ख भिजले दोन अश्रू माणसांचे माणसांना या कवितेतील ओळीप्रमाणे अण्णा साहेबांचे असं म्हणतात की संकट आली किती एका मागून एक येतात त्यांच्यावर मात करून, संघर्ष करून पुढे जायचे असते असे म्हणणे सोपे आहे. परंतु ही संकट अनुभवनं आणि पचवणं तेवढे सोपे नाही. संकट अनुभवता अनुभवता अनेक लोक आपल्या जीवनाचा आणि जीवनशैलीचा ट्रॅक बदलतात. संकटावर भाष्य करण्याचे कारण असे की आज (ता. ७ डिसेंबर) रोजी लोकनेते माननीय जयदत्त क्षीरसागर यांचा वाढदिवस आहे. जयदत्त अण्णांचा संघर्ष केवळ जिल्ह्याने पाहिला नाही तर तो राज्याने पाहिला आहे. त्यावर अत्यंत संयमाने केलेली मात देखील सगळ्यांनी पाहिली आहे. या उपर ही त्यांनी आपल्या लोकाभिमुख, विकासाभिमुख नेतृत्वशैलीत अजिबात बदल केलेला नाही. लोकांच्या संपर्कात राहून त्यांच्या सुखदु:खात सहभागी होऊन आपल्या जनसेवेचा बसा आणि वारसा त्यांनी कायम ठेवलेला आहे. तसे पाहिले तर बीड जिल्ह्याच्या माजी खासदार केशर वाईट क्षीरसागर उर्फ काकू यांच्या लोकनेतृतचे बाळकडू अण्णांना लहानपणापासूनच मिळालेले आहे. स्वत:च्या दैनंदिन येतील ८० टक्के वेळ लोकांसाठी काकूंनी जसा दिला त्याच पद्धतीने आज अण्णा तेवढाच वेळ देत आहेत. सत्ता असो किंवा नसो लोकांची कामे करणे दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी डंके की चोट पर काम करत राहणे त्यासाठी लागणारे बळ सचोटी जिद्द ही अण्णांकडे असल्याचे विरोधक देखील मान्य करतात, तरुणांना लाजवेल अशा वाखण्यासारखी आहे. अत्यंत सकारात्मक ऊर्जा घेऊन अण्णा काम करतात. संकटावर लावली आहेत. कुटुंबातील काही सदस्यांची सत्ता महत्त्वाकांक्षा ते थांबले नाहीत, म्हणून त्यांना अलगत रस्ता दिला. कोणत्याही नावाला गालबोट लागेल, क्षीरसागर घराण्याची पत-प्रतिष्ठा ही संपेल वाढली. काळरूप त्यांना थांबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.. प्रसंगी आता ताईचा निर्णय त्यांनी घेतला नाही. काकूंच्या अशा प्रकारचा निर्णय त्यांनी कधीच घेतला नाही.



आपला संपादक
सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ

जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी बीडला पालकमंत्री असताना सर्वसामान्य जनतेला सोबत घेऊन एकच ध्यास विकासित जात हा उपक्रम राबवत अनेक ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांना शासनाच्या योजना मिळवून दिल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी बांधवांच्या कुटुंबाला न्याय मिळवून दिला ग्रामीण भागातून नोकरीसाठी बीडमध्ये येत असताना जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड जिल्ह्यात स्वर्गीय केशर काकू यांनी उभा केलेल्या शिक्षण संस्थेमध्ये ग्रामीण भागातील भूमिपुत्रांना न्याय दिला यावेळी संबंधित जनतेला आज सुद्धा आपल्या हक्काचा माणूस जगताना क्षीरसागर हाच आपल्या बीड जिल्ह्याच्या विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे दिसून येत आहे आज सुद्धा जनता त्यांना क्षीरसागर यांना मानणारा बीड जिल्ह्यातच नव्हे तर संबंध महाराष्ट्राच्या बाहेर जात भारत देशामध्ये जनतांना क्षीरसागर यांच्याकडे सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन चालण्याच्या भावना व लोकप्रिय नेता लोकनेता कसा असावा तर तो जयदत्तांना क्षीरसागर यांच्यासारखा असावा असेही उद्गार बीड जिल्ह्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून ऐकायला मिळत आहे यातूनच अखिल भारतीय तैलिक महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जयदत्त क्षीरसागर यांनी धुरा सांभाळत समाजाची मूठ बांधत ताकद दाखवून देण्याचे काम या ठिकाणी माजी मंत्री जयदत्त त्यांना शिरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे तर बीड जिल्ह्यामध्ये कधीही जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता स्वत:च्या फायद्यासाठी कधीही वापर न करता आज या ठिकाणी जगताना क्षीरसागर यांनी सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे काम केले आहे यामुळे जगताना हे सर्वांना हवे हवेसे वाटणारे नेतृत्व आहे यातच एकच ध्यास विकासाचा धर्म जात ही भावना घेत

**बीड जिल्ह्याच्या विकासाचा केंद्रबिंदू म्हणून जगताना आपल्याकडे पाहिले जात आहे.**

बीड जिल्ह्यातील जनतेला जनता अण्णा यांचे नेतृत्व का हवे आहेत तर सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन बीड जिल्हा शांततेत राहण्यासाठी सामाजिक सलोखा जपण्यासाठी सर्व जाती-धर्मांनी काम करत असताना १८ पगड जातीच्या समाजाच्या प्रश्नावरती आवाज उठवणारा व सर्व समाजांच्या प्रश्नाचे उत्तर देऊन समाज हिताचं काम करणारा एकमेव नेता म्हणून जगतांना क्षीरसागर यांच्याकडे पाहिले जाते म्हणून जगताना हा माणूस आपल्या हक्काचा आहे बीड जिल्ह्याच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे.

समस्या जाणवत नाही. अशी एक नाही तर असंख्य विकास कामे अण्णासाहेबांच्या नावावरती आहे. खेड्यापाड्यातील जनतेचा विकास झाला पाहिजे यासाठी त्यांना शिक्षण त्यांच्या शेतीला पाणी आणि गतिमान रस्ते निर्माण करून विकासाची गंगा घरोघरी आणण्याचे महान कार्य अण्णासाहेबांनी केले आहे. अण्णा साहेबांनी घेतलेले अनेक दूरदृष्टी निर्णय आज बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देत आहे. अण्णा साहेबांच्या दूरदृष्टीचे आपल्याला अनेक उदाहरणे सांगता येतील त्यापैकीच एक उदाहरण म्हणजे काही वर्षापूर्वी दष्काळ पडला होता लातूर शहराला पिण्याचे पाणी पश्चिम महाराष्ट्रातून रेल्वेने आणावे लागले होते पण त्याच मराठवाड्यात असणाऱ्या बीड जिल्ह्याची तहान मात्र माजलगाव धरणातून येणाऱ्या पाण्याने भागवली, माजलगाव बॅक वॉटर ही योजना किती महत्त्वकांक्षी आणि दूरदृष्टीची होती हे आज लक्षात येते. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन जाण्यासाठी अण्णा साहेबांनी समानतेचा रुजवलेला विचार समाजाला एका उंचीवर घेऊन जाईल असा विश्वास वाटतो. आज अण्णा साहेबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकत असताना असे अनेक मुद्दे आहेत ज्यांचा येथे उल्लेख करणे केवळ अशक्य आहे. अण्णा साहेबांच्या कामाची जंत्री प्रचंड मोठी आहे. अशा लोकाभिमुख आणि लोकप्रिय नेतृत्वाला जपणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अण्णासाहेबांना आज वाढदिवसाच्या शुभेच्छा देत असताना त्यांना उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि सुयश लाभो अशी प्रार्थना करतो. प्रत्येक संकटाला भिडण्याचे आणि धैयनि सामोरे जाण्याचे बळ जयदत्त अण्णा ना मिळो. माझ्या अण्णा च्या हातून सर्व सामान्यांचा सर्वांगीण विकास होवो, माझ्या नेत्याला जनतेची सेवा करण्याची संधी मिळावी यासाठी मायबाप जनतेचे भरभरून आशीर्वाद मिळोत हीच प्रार्थना.



बीडच्या राजकारणात अनेक घरांनी उदयाला आली. त्यांनी आमदारकी खासदारकी मिळवली ही श्रीपत राय कदम केशर बाईक क्षीरसागर गोपीनाथराव मुंढे यांनी मात्र राजकारणात फारच पुढचा टप्पा घातला. मंडळींचे नेतृत्व जिल्ह्याने राज्यभरात मान्यता मिळवून होते यातही विशेष आणि कौतुकाची बाब म्हणजे संख्येने अल्प म्हणावे अशा समाजात जन्मलेल्या क्षीरसागर कुटुंबाने जिल्हाभर लोकप्रियता मिळवली.

प्रेम मिळवले जिल्ह्यात असे एखादेही गाव नसेल तिथे क्षीरसागर यांचा कार्यकर्ता नाही खासदार कापून निर्माण केलेल्या या या लोकसंग्रहात वर टाकली ती त्यांचे सुपुत्र जयदत्तक्षीरसागर यांनी पंचायत समिती चे सभापती तो राज्य सरकार मधले महत्त्वाचे मंत्री केलेली वाटचाल म्हणजे त्यांनी सर्वसामान्यांच्या मिळवलेल्या अतूट प्रेमामुळे शक्य झाले ते बाकीचे आहेत. समितीचे सभापती असताना त्यांचा माझा संबंध आला आणि तो वाढला याचं कारण मी आजवरच्या पत्रकारितेच्या काळात बहुतेक सर्वच नामवंत नेते पाहिले पण बहुतेक नेते हे साहेबच होते आणि साहेबच राहिले जयदत्त क्षीरसागर मात्र कदाचित त्यांच्या स्टाफचे साहेब असतील पण सर्वसामान्यात्चे मात्र अण्णा आहे आणि एकदा अण्णा झालं की मोठेपणाचा जो सन्मान मिळतो तो टिकवून ठेवणे किती अण्णांना जमले शक्य झाले आता मी काय सांगावं त्यात सर्वात मात्र आज अगदी आज भी जयदत्त क्षीरसागर हे सर्वांचेच खरोखर अण्णा आहेत म्हणजेच कोणाचीआहे. अडचणीला आधार म्हणून माणसं त्यांच्याकडे पाहतात घरगुती भांडण असो वा यादी गंभीर अडचण हमखास लोकांना आठवतंय ते अन्नाचे नाव त्यांनी घेतल्या असतील कदाचित पण वैयक्तिक आयुष्यात अत्यंत हळवा आणि

भावनाप्रधान असा माणूस आहे एक वेळ काकूंच्या स्मृतिदिनी या वेळेला एका गायिकेने माधव जुलियन यांची अमर मातृवंदना प्रेम स्वरूप आई वात्सल्य सिंधू आई हे अत्यंत समरसून गाईल त्या वेळेला चष्म्या अडून डोळे पुसताना मी पाहिले आहे कार्यकत्र्याच्या काय ? पण साधारण ओळखीच्या माणसाच्या सुद्धा अडचणींनी त्यांना अस्वस्थता बाटते राजकीय नेत्यांपेक्षा मला फारच आवडतो तो म्हणजे त्यांची वाचनाची आवड केवळ एकच विषय नाही सर्वस्पर्शी असं त्यांचं वाचन आहे कथा कादंबऱ्या विज्ञान यापासून तो अध्यात्मिक क्षेत्रापर्यंत त्यांचं वाचन अध्यायवत आहे याची जाणीव यांची भाषणे ऐकताना होते एकंदरीत माणूसपण जपणाऱ्या राजकारणात राहूनही सुसंस्कृत असलेल्या जयदत्त क्षीरसागर यांना जन्मदिनाच्या खूप खूप शुभेच्छा!

# जेष्ठांना समाज व प्रशासनाने सन्मानाची वागणूक द्यावी - जगन्नाथ मामडगे

गेवराई । प्रतिनिधी

कुटुंबाला आकार देणारा मेहनती कुटुंबप्रमुख जेव्हा वृद्धावस्थेत जातो तेव्हा त्याला आधाराची गरज असते . परंतु आधारा ऐवजी त्याच्या पदरी निराशा मिळते . अशा जेष्ठ नागरिकांना समाज व प्रशासनाने सन्मानाची वागणूक द्यावी असे आवाहन जेष्ठ नागरिक संघाचे बीड जिल्हाध्यक्ष जगन्नाथ मामडगे यांनी गेवराई येथील बैठकीत केले .

५ डिसेंबर २०२३ रोजी गेवराई येथील न्यू हायस्कूल सभागृहात सायं ५ वाजता शहरातील जेष्ठ नागरिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते . अध्यक्षस्थानी जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक बाबुराव पिंपळे तर प्रमुख मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ मामडगे यांची विशेष उपस्थिती होती . बैठकीस वयोवृद्ध नागरिक व्यंकटराव पंडित, बप्पासाहेब मोघे, गोविंदराव शेळके, रामराव चाळक, एस. वाय. अन्सारी, माजी सैनिक रामकृष्ण चेडे आदींची प्रमुख उपस्थिती होती . प्रारंभी शाळेच्या विद्यार्थिनींनी पूज्य साने गुरुजींची खरा तो एकची धर्म ही रचना सादर केली . मंचावरील मान्यवरांचे स्वागतानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले . उपस्थित जेष्ठ नागरिकांचा परिचय करून देण्यात आला . बैठकीचे संचालन व प्रास्ताविक तालुका संपर्कप्रमुख प्रा . राजेंद्र बरकसे यांनी केले . यावेळी राजमाता जिजाऊ , छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व स्वामी विवेकानंद अशा ५ जेष्ठ नागरिक संघाचे नवनिर्वाचित प्रमुख प्रा. संदिपान हिंगे, दत्तात्रय इंदे, सुभाष रणखांब, ईश्वर आबदरे ,भास्कर ननवरे, सखाराम कानगुडे ,उत्तमराव सोलाने आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . याप्रसंगी काही जेष्ठ नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या . आपल्या प्रमुख भाषणात जिल्हाध्यक्ष मामडगे यांनी आपण वयाने वाढलो आहोत . आजही आपल्या तरुण मनात इच्छा आकांक्षा काही नव्याने करून दाखवण्याची क्षमता आहे . परंतु सामाजिक परिस्थितीमुळे व एकटेपणामुळे ते शक्य होत नाही . जेष्ठ नागरिक संघाच्या माध्यमातून आपण संघटित होऊन अशक्य ते शक्य करू शकतो . राज्य सरकार ही जेष्ठांसाठी अनेक योजना राबवित आहेत . आपल्याही काही मागण्या शासन दरबारी आहेत . बीड जिल्ह्यात अंबाजोगाई



तालुक्यात सर्वाधिक संघ आहेत . आपणही गेवराई तालुक्यात गाव तिथे संघ संकल्पना राबवून ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिकांना आधाराची खरी गरज आहे . त्यांना संघटित करून त्यांच्या अडी अडचणी दूर करून त्यांना धीर देणे, विचारांची देवाणघेवाण करणे, आरोग्य तपासणी करणे , विरंगुळा म्हणून विविध कार्यक्रमात सहभाग घेणे यागोष्टी यापुढे आपल्याला करायच्या आहेत . जेष्ठांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे . राष्ट्रीय स्तरावरून ( फेसकॉम ) ग्रामीण भागातही जेष्ठ नागरिक संघाचं जाळं पसरलं आहे . आपण एकत्र आल्याशिवाय शासन दरबारी आपले वजन पडणार नाही . त्यासाठी विधायक कार्य देशसेवा म्हणून आपण एकत्र येवू असे ते म्हणाले . बैठक यशस्वीतेसाठी न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक तौर अंकुश ,पर्यवेक्षक कोल्हे, वेलनेस कोच नितीन कुल्थे ,प्रा रविंद्र खरात, विजय धुरंधरे आदींनी परिश्रम घेतले .ज्ञानेश्वरी येवले, ममता अंधारे यांनी गायलेल्या पसायदानाने बैठकीची सांगता झाली . या बैठकीस शहर व ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिक बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या अधिवेशनात संमत ठरावाच्या मुद्द्यावर आवाज उठवा


## गेवराईत आ.लक्ष्मण पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

व्हॉईस ऑफ मीडियाच्या बारामती अधिवेशनात संमत करण्यात आलेल्या विविध ठरावावर निर्णय घेण्यासंदर्भात हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करुन पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवून पाठपुरावा करावा याबाबत गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आ.लक्ष्मण पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. दरम्यान यावेळी पत्रकारांशी बोलताना आ.पवार म्हणाले की, पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी आपण हिवाळी अधिवेशनात आवाज उठवून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी करणार आहोत.असा सकारात्मक प्रतिसाद देवून व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकाराच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या देशव्यापी पत्रकार संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाउपाध्यक्ष विनोद नरसाळे, भागवत जाधव, तालुकाध्यक्ष विनोद पौळ, तालुका सचिव सुनिल मुंडे,



वैजीनाथ जाधव, जेष्ठ पत्रकार बापू गाडेकर यांच्या सह आदी पदाधिकारी उपस्थित होते. व्हॉईस ऑफ मीडिया हे पत्रकारांची देशव्यापी संघटना असून संपूर्ण देशभरात ३७ हजार सदस्य आहेत. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी संघटना सातत्याने कार्यरत आहे. नुकतेच बारामती येथे व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्यस्तरीय शिखर अधिवेशन पार पडले. यात राज्यभरातून दीड हजार पत्रकार बांधव सहभागी झाले होते. या अधिवेशनात पत्रकारांशी संबंधित विविध १४ ठराव एकमताने पारित करण्यात आले. असून या ठरावाची समीक्षा करून शासनाच्या वतीने यावर तातडीने निर्णय घेण्याच्या दृष्टीने आपले सहकार्य अपेक्षित आहे. यासंदर्भात विधानसभेत पत्रकारांच्या वतीने आपण हा मुद्दा उपस्थित करावा अथवा माननीय मुख्यमंत्र्यांशी भेट घेऊन हे ठराव शासन पातळीवर मंजूर करण्यास सहकार्य करावे अशी मागणी गेवराई मतदारसंघाचे आमदार ड. लक्ष्मण पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी गेवराई तालुका व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# टाकरवन येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

टाकरवन । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यतिल टाकरवन ग्रामपंचायत कार्यालय येथे आज सहा डिसेंबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन या दिनानिमित्त मा.सरपंच सुनील नाना तौर यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली आणि त्यांना विनम्र अभिवादन केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र टाकरवन येथे डॉ.राठोड व अंजनवाड साहेब यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली त्यावेळी उपस्तित सर्व स्टाफ महापरिनिर्वाण दिनानिमित्त आपण सर्वानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याचे आदर्श घेऊन पुढे वाटचाल केली पाहिजे असे मत कपिल आडगळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी मा.उपसरपंच दयानंद गोबरे, ग्रा.पं.सदस्य अशोक खुळे , जर्नाधन आडागळे , लक्ष्मण गरड ,गणेश सातपुते त्याचबरोबर , शांतिलाल पटेकर योगेश कानडे , भैयासाहेब उजगरे, विलास लव्हाळे ,नवनाथ लव्हाळे,अशोकआडगळे , विठ्ठल आडगळे, प्रकाश पटेकर इ... उपस्थित होते.

# जयदत्त अण्णा तुमचा आमचा आणि आपला हक्काचा आवाज

विशेष प्रतिनिधी । बीड

बीडच्या राजकारणात अनेक घरांनी उदयाला आली. त्यांनी आमदारकी खासदारकी मिळवली ही श्रीपत राय कदम केशर बाईक क्षीरसागर गोपीनाथराव मुंढे यांनी मात्र राजकारणात फारच पुढचा टप्पा घातला. मंडळींचे नेतृत्व जिल्ह्याने राज्यभरात मान्यता मिळवून होते यातही विशेष आणि कौतुकाची बाब म्हणजे संख्येने अल्प म्हणावे अशा समाजात जन्मलेल्या क्षीरसागर कुटुंबाने जिल्हाभर लोकप्रियता मिळवली.प्रेम मिळवले जिल्ह्यात असे एखादेही गाव नसेल तिथे क्षीरसागर यांचा कार्यकर्ता नाही खासदार कापून निर्माण केलेल्या या या लोकसंग्रहात वर टाकली ती त्यांचे सुपुत्र जयदत्त



क्षीरसागर यांनी पंचायत समिती चे सभापती तो राज्य सरकार मधले महत्त्वाचे मंत्री केलेली वाटचाल म्हणजे त्यांनी सर्वसामान्यांच्या मिळवलेल्या अतूट प्रेमामुळे शक्य झाले ते बाकीचे आहेत. समितीचे सभापती असताना त्यांचा माझा संबंध आला आणि तो वाढला याचं कारण मी आजवरच्या पत्रकारितेच्या काळात बहुतेक सर्वच नामवंत नेते पाहिले पण बहुतेक नेते हे साहेबच होते आणि साहेबच राहिले जयदत्त क्षीरसागर मात्र कदाचित त्यांच्या स्टाफचे साहेब असतील पण सर्वसामान्यात्चे मात्र अण्णा आहे आणि

एकदा अण्णा झालं की मोठेपणाचा जो सन्मान मिळतो तो टिकवून ठेवणे किती अण्णांना जमले शक्य झाले आता मी काय सांगावं त्यात सर्वात मात्र आज अगदी आज भी जयदत्त क्षीरसागर हे सर्वांचेच खरोखर अण्णा आहेत म्हणजेच कोणाचीआहे. अडचणीला आधार म्हणून माणसं त्यांच्याकडे पाहतात घरगुती भांडण असो वा यादी गंभीर अडचण हमखास लोकांना आठवतंय ते अन्नाचे नाव त्यांनी घेतल्या असतील कदाचित पण वैयक्तिक आयुष्यात अत्यंत हळवा आणि भावनाप्रधान असा माणूस आहे एक वेळ काकूंच्या स्मृतिदिनी या वेळेला एका गायिकेने माधव जुलियन यांची अमर मातृवंदना प्रेम स्वरूप आई वात्सल्य सिंधू आई हे अत्यंत समरसून गाईल त्या वेळेला चष्म्या अडून डोळे पुसताना मी पाहिले आहे कार्यकत्र्याच्या काय ? पण साधारण ओळखीच्या माणसाच्या सुद्धा अडचणींनी त्यांना अस्वस्थता बाटते राजकीय नेत्यांपेक्षा मला फारच आवडतो तो म्हणजे त्यांची वाचनाची आवड केवळ एकच विषय नाही सर्वस्पर्शी असं त्यांचं वाचन आहे कथा कादंबऱ्या विज्ञान यापासून तो अध्यात्मिक क्षेत्रापर्यंत त्यांचं वाचन अध्यायवत आहे याची जाणीव यांची भाषणे ऐकताना होते एकंदरीत माणूसपण जपणाऱ्या राजकारणात राहूनही सुसंस्कृत असलेल्या जयदत्त क्षीरसागर यांना प्रकटदिनाच्या खूप खूप शुभेच्छा! आपलाच कार्यकर्ता अरूण बोगाणे.



बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त माननीय श्री अशोक शेजवळ साहेब यांनी बीड तालुक्यातील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेर चिंचोली शाळेतील विद्यार्थी साईराज झनझन या विद्यार्थ्याला दोन हजार रुपये आर्थिक मदत केली. तसेच होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे मा.प्राचार्य डॉ. अरुण भस्मे यांनी मदत केली. मा. अशोक शेजवळ साहेबांनी बॅनर चा खर्च टाळून गोर गरीब विद्यार्थ्याला आर्थिक मदत केली पाहिजे याच भावनेतून ते विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षी आर्थिक मदत करतात . यावेळी लोकाशाचे निवासी संपादक उत्तम हजारे ,विजू गायकवाड, मोरे मामा ,लोकतंत्र चे संपादक अनिल जाधव उपस्थित होते.

# शासन आपल्या दारी कार्यक्रमात शेतकरी आत्महत्यावर कोणीच ब्र शब्द काढला नाही हे जिल्ह्याच दुर्दैव - भाई मोहन गुंड

## आख्ख मंत्रीमंडळ कृषी मंत्र्याच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या पदरी काय पडलं....?

काल शासन आपल्या दारी कार्यक्रमात शेतकरी आत्महत्या बद्दल भ्र शब्द कोणी काढला नाही हे जिल्ह्याच दुर्दैव आहे, शासन आपल्या दारी म्हणत काल परळीत भला मोठा विकासाचा गाजावाजा करण्यासाठी लोकांना एकत्रीत, करण्यासाठी परिवाहन मंडळाच्या सर्व एस टी बस बुक केल्या गेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या सोडल्यातर एक ही गाडी ग्रामीण भागात नव्हती, ग्रामीण भागातील विध्यार्थी, कायम प्रवास करणारे प्रवाशांचे यामुळे सर्व सामान्याचे खूप हाल झाल्यामुळे शासनाचा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई मोहन गुंड यांनी निषेध व्यक्त केला आहे.मुख्यमंत्री दोन उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्व पक्षीय नेत्यांनी हजेरी लावली पण बीड जिल्हा वाशियांच्या पदरी काय पडलं. शासन आपल्या दारी कार्यक्रम करुन कोटी रुपयची उधळपट्टी मात्र केली, रोज एक शेतकरी अत्महत्या करतोय त्यांच्या दारी जाऊन बघा काय परिस्थिती आहे. व्यासपीठावर असणारे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि लोकप्रतिनिधीनी एक भ्र शब्द सुद्धा शेतकऱ्याच्या आत्महत्या कशा थांबवल्या जातील यावर बोलले नाहीत, हा नेमका कार्यक्रम कशासाठी होता हा प्रश्न माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पडला आहे महाराष्ट्राच्या एकूण आत्महत्याच्या तुलने मध्ये बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या चा आकडा मोठा आहे सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात आतापर्यंत झाल्या आणि आज ही आत्महत्याचं सत्र थांबायला तयार नाही, कार्यक्रमात कृषीमंत्री जिल्ह्यातील असल्यामुळे ठोस पाऊल उचलतील आशी अपेक्षा होती परंतू मोठी भ्रमनिराशा झाली.जिल्ह्यात पिक विमा, अतिवृष्टीचे पैसे शेतकऱ्यांना मिळत नाहीत, पुनर्रगठन च्या नावाखाली शेतकऱ्यांना फसवणूक केली जात आहे. खरंतर शेतकऱ्याचं दुर्दैव आहे असा आरोप करत शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचा जाहीर निषेध शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धीपत्रक काढुन केला आहे..

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिर शासकीय रुग्णालय बीड येथे संपन्न

## राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा सामाजिक उपक्रम

बीड ।अंकुश गवळी

आज देशामध्ये रक्ताचा खूप तुटवडा आहे तसेच आपल्या जिल्ह्यामध्ये पण रक्ताचा खूप साठा कमी आहे आणि रोज रुग्णांसाठी रक्त लागत आहे अनेक प्रकारचे पेशंट येतात एक्सीडेंट असेल किंवा इतर आजारांचे पेशंट असतील यांना रक्त लागते तसेच आपला एक रक्ताचा थेंब समोरच्याचे जीवन वाचू शकते त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामाजिक उपक्रम काहीतरी घेतला पाहिजे म्हणून सामाजिक बांधिलकी या नात्याने आम्ही रुग्णांना मदत होईल ह्या हेतूने हा सामाजिक उपक्रम घ्यायचा ठरवले आहे यामध्ये महिला आघाडी व इतर कार्यकर्ते मिळून हा रक्तदान शिबिर घेतले एक पुण्याचे काम करावे व आपल्यामुळे नवीन कोणाला तरी जीवदान मिळेल याचे समाधान म्हणून आपल्या पुण्याच्या पारड्यात नक्कीच भर पडत असते त्यामुळे आज रक्ताची खूप गरज आहे त्यामुळे वेगवेगळ्या संघटना पक्ष यांनी रक्तदान या उपक्रमावर जास्तीत जास्त भर देऊन शासनास किंवा आपल्या अडचणीत असणाऱ्या रुग्णास मदत करावी आजचा कार्यक्रम खूप छान झाला सर्वांच्या सहकार्याने राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून हे रक्तदान शिबिर संपन्न झाले

डॉक्टर सी एस चव्हाण साहेब जिल्हा रुग्णालय बीड .श्री मतकर अण्णासाहेब रासपा जिल्हाध्यक्ष बीड. माने भगवान कर्मचारी जिल्हाध्यक्ष. विक्रम बाप्पा सोनसळे लोकसभा अध्यक्ष. परशुराम काशीद विद्यार्थी आघाडी. किरण डोळस महिला जिल्हाध्यक्ष. तुषार उंबरे युवक जिल्हाध्यक्ष. शिवाजी चांगण युवा नेते .माऊली मर्कड विधानसभा अध्यक्ष बीड . कपिल गाडेकर परळी तालुका



अध्यक्ष .दत्ता काळे वडवणी तालुकाध्यक्ष. भागवत आगाम इंग्लिश स्कूल संस्थापक अध्यक्ष.नितीन चव्हाण पत्रकार .सुनील बहिरवाल युवा उद्योजक .संगीता कानडे तालुका अध्यक्ष महिला बीड. सीमा डोळस . मीना शेळके इतर सर्व पदाधिकारी होते.




लिंबागणेश:- बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकनेते जयदत्तजी आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि.७ डिसेंबर गुरुवार रोजी शिवाजी रणखांब यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे उपस्थित होते. माजी सैनिकांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी सहशिक्षक अमर पुरी,संदिपान आगम,भरत चौरे,माधुरी कुलकर्णी,सुवर्णा अयाचित, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आण्णासाहेब सामान्याचा आवाज - बिलास विधाते




ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख जरी आपल्या बीड जिल्हाची असली तरी पुढे अनेक वर्षे अशीच राहावी असे कोणालाच वाटत नाही. जोपर्यंत बीड जिल्ह्यात नवीन उद्योग व्यवसाय येणार नाहीत, रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार नाहीत, कौशल्य असलेल्या शिक्षणाच्या संस्थांची जाळे उभे राहणार नाही, शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा विचार होत असताना शिकलेल्या पोरांच्या हाताला काम आणि केलेल्या कामाला दाम जोपर्यंत योग्य पद्धतीने मिळणार नाही. पारंपारिक शिक्षणाची कास सोडून जग हे प्रचंड मोठे आहे हे जोपर्यंत समजून घेतले जाणार नाही तोपर्यंत या जिल्ह्यावरचा हा ऊस तोडणारा जिल्हा या शिक्याला आपण पुसू शकणार नाही.

हा प्रयत्न १९८० च्या दशकानंतर प्रभावीपणे ज्यांनी केला त्यामध्ये बोटावर मोजण्या इतकीच नावे आपल्याकडे पहावयास मिळतील. लौकिक अर्थाने कमी शिकलेल्या मात्र समाजाच्या विकासाची नस माहिती करून घेतलेल्या नेत्या म्हणून सौ. केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी शिक्षणाची गंगोत्री ग्रामीण भागात आणली पुढे त्याचा वटवृक्ष करण्याचा प्रयत्न आण्णासाहेबांनी केला. त्यांच्या प्रयत्नामुळेच आज बीड जिल्ह्यातल्या पाटोदा शिरूर परळी बीड या शहरात उच्च शिक्षणाची तर बीड परिसरात वैद्यकीय शिक्षणाबरोबरच सैनिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली. या शिक्षणाने क्रांती केली परिणामी आज बीड जिल्ह्यातील अनेक मुले वेगवेगळ्या जिल्ह्यात डॉक्टर म्हणून जसे काम करतात त्याच पद्धतीने पोलीस भरती पासून सैनिक भरती पर्यंत प्रत्येक क्षेत्रात ग्रामीण भागातल्या मुलांना या शैक्षणिक संकुलामुळे संधी मिळाली असेही शैक्षणिक वैभव ज्यांच्यामुळे उभे राहिले त्या आदरणीय मा. मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेबांचा आज वाढदिवस.

आण्णासाहेब तसे ठरवून राजकारणात आलेला नेता. काकू आणि नाना यांनी सुरू केलेली राजकीय परिवाराची धुरापुढे घेऊन जाण्यासाठी नेतृत्व गुण जे जे लागतात ते ते त्यांच्या ठायी आहेत. घरातला ज्येष्ठ पुत्र म्हणून त्यांनी स्वतःचे राजकीय सामाजिक आर्थिक शैक्षणिक चारित्र्य सांभाळत सांभाळत स्वतःला एका विशिष्ट उंचीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. राजकारण समाजकारण या क्षेत्रात काम करताना अनेक वेळा संघर्ष व्यक्तिगत कटुता निर्माण होते मात्र जो वसा व वारसा आपण घेतलेला आहे तो अर्ध्यावर सोडता येत नाही परिणामी त्याचे गंभीर परिणामही कधीकधी भोगावे लागतात. १९८५ पासून सातत्याने विधानसभेच्या निवडणुकीत त्यांना कधी जिंकण्याचा तर कधी हरण्याचा अनुभव घ्यावा लागला. विधानसभेत निवडून गेल्यानंतर पहिल्याच वेळेस राज्याचा उपमंत्री होण्याची संधी भेटली नंतर राज्यमंत्री त्यानंतर ते अनेक वर्ष कॅबिनेट मंत्री होते शिक्षण- सार्वजनिक बांधकाम- ऊर्जा अशा महत्त्वपूर्ण खात्याचे मंत्री म्हणून काम करताना आपल्या हाताने आपल्या जिल्ह्यातल्या माणसांसाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ऊर्जामंत्री असताना बीड जिल्ह्यातल्या अनेक भागात विजेचे उपकेंद्र त्यांनी निर्माण केले. बीड शहराला लागणाऱ्या विजेसाठी स्वतंत्रपणे वाहिनी त्यांनी आणली त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम उपक्रम मंत्री असताना जिल्ह्यातून जाणाऱ्या अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय मार्ग बीड जिल्ह्यातून जावेत त्याचे भूसंपादन होत असताना आपल्या भागातल्या शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये याची त्यांनी काळजी घेतली. महाराष्ट्रातल्या सिलिंग पासून नागपूरच्या उड्डाणपूला पर्यंत आणि बीड जिल्ह्यातल्या सोलापूर धुळे रस्त्यापासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या उड्डाणपुलाच्या प्रकल्पापर्यंत. प्रत्येक कामात त्यांचा वाटा राहिलेला आहे वास्तविक पाहता ते उपमंत्री असताना त्यांनी बीड शहराच्या दृष्टीने अत्यंत चांगली योजना आखली होती दुर्दैवाने स्थानिक राजकारणामध्ये त्यांना ती योजना पूर्ण करता आली नाही. परिणामी शहराच्या विकासात भर घालणारा एक चांगला रस्ता होऊ शकला नाही याची खंत त्यांच्या मनात आजही आहे. त्याचबरोबर चौसाळा विधानसभा मतदारसंघातून निवडून गेल्यानंतर त्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणणारे अनेक प्रकल्प त्यांनी उभे केले विशेषता सारणी सांगवी साठवून तलावानंतर चौसाळा मतदार संघात झालेले बहुतांशी साठवण तलाव हे त्यांच्याच कारकिर्दीचे साक्ष ठरतात. अप्पर कुंडलिका प्रकल्पापासून सातरा पोतरा प्रकल्पापर्यंत व हिवरापाडीच्या प्रकल्पापासून चार जरी प्रकल्पापर्यंत धारूरच्या घाटात होणारा प्रकल्प असेल किंवा भोगलवाडीच्या परिसरात झालेला साठवण तलाव असेल या सर्व भागावर त्यांनी लक्ष ठेवून पाणी आडवा पाणी जिरवा ही भूमिका जिल्ह्यात सर्वप्रथम त्यांनी घेतली. जलयुक्त शिवाराची सुरुवात दहा वर्षांपूर्वी झाली परंतु पंचवीस वर्षांपूर्वी चौसाळा मतदार संघात पाण्याची पातळी वाढण्यासाठी जे प्रकल्प निर्माण झाले त्यात जयदत्त क्षीरसागर यांचा वाटा महत्त्वाचा आहे हे नाकारता येणार नाही. चौसाळा मतदार संघा नंतर त्यांनी एक वेळा बीड मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले तेव्हाही त्यांनी या मतदारसंघात ज्या योजना शक्य आहेत त्या योजना आणण्याचा प्रयत्न केला त्यानंतर पुन्हा त्यांना संधी भेटली मात्र राज्यात सत्तांतर झाल्यामुळे विकासाच्या योजनेचा स्त्रोत कमी झाला परंतु राज्याच्या राजकारणात असलेले दबदबा राजकीय संबंध वेगळ्या पक्षात असलेली मैत्री जोपासून त्यांनी या भागामध्ये विकासासाठी अधिक निधी कसा आणता येईल असा प्रयत्न केलेला आहे. एकीकडे विकासाचे काम सुरू असताना दुसरीकडे सांस्कृतिक क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. अखिल भारतीय नाट्य स्पर्धेपासून साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमापर्यंत पुढाकार घेऊन त्यामध्ये योगदान देण्याची त्यांची परंपरा आजही सुरू आहे. नवीन कार्यकर्त्यांना संधी देताना जुन्या कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली. आपल्याबरोबर काकू पासून काम करणारे अनेक कार्यकर्ते आहेत त्यांची नाराजी ओढून न घेता नवीन पोरांना संधी देण्याची त्यांची योजना ही विकासाला पोषक आहे.

गेली पाच वर्षे ते बीड जिल्ह्याच्या सत्ते बाहेर असले तरी सरकार बरोबर समन्वय ठेवून त्यांनी किमान ४०० ते ५०० कोटी रुपये बीड मतदार संघात विकास योजनेसाठी आणलेले आहेत. आज शहरांमध्ये दिसणारे चांगले सर्व रस्ते त्यांच्यामुळे निर्माण झालेले आहेत. वास्तविक पाहता विधानसभेच्या निवडणुकीमध्ये रस्त्यांच्या कामाची सुरुवात झाली होती अचानक आलेल्या पावसाने रस्त्याची पूर्ण वाट लागली त्या सर्व गोष्टीचे खापर आण्णासाहेबांच्या डोक्यावर फोडण्यात आले परिणामी त्याचा निवडणुकी वर परिणाम झाला व विकासाची योजना राबवण्याच्या नादात स्वतःचा पराभव नशिबी आला. मात्र या प्रभावाने खचून न जाता त्यांनी सामान्य लोकांशी असलेली नाळ तुटू दिली नाही. व्यक्तिगत काम करणारा कार्यकर्ता त्याच्या सुखदुःखामध्ये उपस्थित राहून त्याला धीर देण्याचा काम अण्णांनी अनेक वर्ष केले. आज बीड जिल्ह्यात राजकीय अस्थिरता आहे कोणता नेता कोणत्या पक्षात आहे कोणता नेता कोणत्या पक्षात भविष्यात जाईल असे सगळे गोंधळाचे वातावरण असताना विशेष म्हणजे ज्या पक्षाला त्यांनी भरभरून दिले त्या पक्षाने त्यांच्यावर कारवाई केली असताना त्यांनी मात्र आपल्या समाजसेवेचा रस्ता चालण्याचे काम सुरू ठेवलेले आहे. आण्णासाहेब हे केवळ एक व्यक्ती नसून ते एक समूह आहेत. ते जेव्हा चालतात तोच त्यांचा पक्ष तोच त्यांचा विचार असतो. त्यामुळे अशा विकास प्रिय नेत्याला पुढील राजकारणासाठी शुभेच्छा देत असताना , त्यांच्या खांद्यावर अधिक जबाबदारीचे ओझे आहे असे वाटू लागते राजकारणामध्ये वयाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आलेली आहे. संपूर्ण जिल्ह्याचे पालकत्व त्यांनी स्वीकारावे अशी स्थिती आज असताना या सर्व राजकारणात त्यांनी दाखवलेला संयम कौतुकास पात्र आहे. धरसोड प्रवृत्तीचे राजकारण उंच उंच शिखरावर असताना त्यांनी मात्र प्रामाणिकपणे सामान्य लोकांची नाळ टिकून ठेवण्याची भूमिका घेतली आहे. आगामी काळामध्ये प्रचंड संघर्षाचा काळ असणार आहे जातीपातीच्या भिंती पाडून सर्वसमावेशक नेतृत्व बीड मतदार संघाला देण्याची जबाबदारी आण्णासाहेबांना आदर्श मानणाऱ्या लोकांच्या खांद्यावर आहे . मागील काळात राजकीय अनेक उलथापालथ झाल्या जो तो सोयीचा मार्ग शोधू लागला. आपल्या माणसापेक्षा सत्ते साठी दुरचे आपले वाटू लागले. आणि ज्या वटवृक्षाखाली सत्तेची गोड फळे चाखली असे जवळचे नाही तर रक्ताच्या नात्यातील माणसे सोडून गेले. अशा परिस्थितीत ज्यांच्या बोटाला धरून राजकारण समाजकारण शिकलोत सत्तेची अनेक पदे उपभोगली तेंव्हा भविष्यात राजकीय सामाजिक परिस्थिती कशी राहीली तरी आणि कोणतीही किंमत चुकवावी लागली तरी एक कार्यकर्ता म्हणून आमच्या राजकारणाचा शेवट आण्णासाहेबा बरोबरच राहील. आमच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही अण्णांचे कार्यकर्ते म्हणून घेण्यातच धन्यता मानू.

तेव्हा आता आपण सर्वांनी सर्वांनी एकत्रित येऊन त्यांच्या विकासात्मक दृष्टीला व त्यांच्या राजकीय भविष्याला मदत केली पाहिजे याच भूमिकेतून त्यांचा हा वाढदिवस संपूर्ण जिल्ह्यात साजरा केला जात आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढदिवस साजरा होत असताना मराठवाड्यात दुष्काळाचे सावट तर दुसरीकडे सामाजिक संघर्षाचे वातावरण अशा परिस्थितीत डाम डोल न करता उत्तरदायित्वाच्या भावनेतून साजरा करण्याचे धोरण त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांनी स्वीकारले आहे.

वेगवेगळ्या सामाजिक उपक्रम रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी शिबिर, अन्य काही सार्वजनिक योजनांची माहिती देऊन हा वाढदिवस साजरा होत आहे. भविष्यात त्यांच्या राजकीय सामाजिक नेतृत्वाला अधिक बळकटी मिळो आणि पुन्हा एकदा बीड जिल्ह्याच् पालकत्व त्यांना लाभो याच बरोबर दिर्घ आयु उत्तम आरोग्यासाठी पांडुरंग चरणी प्रार्थना. पुनश्च एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत माझं शब्द प्रपंच थांबवतो.

तुमचाच एकनिष्ठ कार्यकर्ता
शब्दांकन
विलास विधाते

## बीड जिल्ह्यात बहुसंख्येने असलेल्या धनगर वंजारी बंजारा समाजाला मुख्यमंत्री साहेब का? डावले जातंय घरकुलापासून?-दत्ता वाकसे

### धनगर वंजारी बंजारा समाज केंद्रातील ओबीसीमुळे घरकुल योजने पासून राहणार वंचित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यांना ओबीसी घरकुलांचे टार्गेट दिले असून यामध्ये मात्र धनगर वंजारी बंजारा या समाजाला केंद्रात ओबीसी असल्यामुळे घरकुलापासून डावले जात आहे त्यामुळे तात्काळ मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी लक्ष घालून. अगोदरच घरकुलांच्या योजनांपासून वंचित असलेल्या धनगर वंजारी बंजारा. या समाजाला तात्काळ समाविष्ट करून बेघरांना घरे उपलब्ध करून देण्यात यावेत.अशी मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी मुख्यमंत्री कार्यालयांना पत्र देऊन मागणी केली. आहेदिलेली पत्रात पुढे म्हटले आहे की धनगर समाजा डोंगरदऱ्यामध्ये भटकती करणारा समाज असून त्याचबरोबर बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात ऊसतोड कामगार.म्हणून वंजारी समाजाकडे पाहिलं जातो तो समाज आजही परराज्यामध्ये ऊस तोडणी.साठी जातो त्यांना त्यांच्या हक्काचे घर उपलब्ध नाही त्याचबरोबर हक्काचे घर मिळावे यासाठी केंद्र सरकारने पी एम वाय ही घरकुल योजना अमलात आणलेली.आहे या घरकुल योजने पासून वंचित ठेवण्याचा डाव राज्य सरकारने केला आहे की काय? त्याचबरोबर बंजारा समाज हा तांडा वस्तीवर राहून स्वतःचा. उदरनिर्वाह करत आहे त्यानाही हक्काचे घरे उपलब्ध नाहीत तेही भटकती करत आहेत त्यांना आज परिस्थिती बघितली तर तांड्यावर वस्त्यावर घरी आहेत परंतु पक्की उपलब्ध. नाहीत कुडाच्या घरामध्ये राहून पत्र्याच्या घरामध्ये राहून ते स्वतःचा उदरनिर्वाह.करीत आहेत या तिन्ही समाजावर घरकुल पासून वंचित ठेवण्याचा डाव या सरकारने आखला आहे की काय असा प्रश्न निर्माण होत आहे गेल्या पंधरा दिवसांपूर्वी पंचायत समिती कार्यालयाकडून सर्व ग्रामपंचायत यांना सूचना करण्यात आलेले आहेत की या तीनही जातींना भटके मुक्त असलेल्या धनगर वंजारी बंजारा यांना केंद्रामध्ये ओबीसी असलेल्या या समाजाला या योजना मिळणार नाहीत त्यामुळे.ओबीसीतील इतर समूह त्यांना त्या योजना लागू होत आहेत व्ही जे एन टी. म्हणजे धनगर वंजारी बंजारा या तीन जाती यांना.राज्य सरकारला मुख्यमंत्र्यांना उपमुख्यमंत्र्यांना घरकुलापासून वंचित ठेवायचे आहे की काय? का त्यांना न्याय मिळवून द्यायचा नाही का हक्काचे घर.मिळून द्यायचे नाही का जाणून बुजून या तिन्ही समाजावर अन्याय करायचा ठरवला आहे की काय?



असाही प्रश्न दिलेल्या. पत्रकामध्ये केला आहे आज परिस्थिती पहिली तर बीड जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाड्यावर दऱ्याखोऱ्यामध्ये.आणि ऊसतोड कामगार म्हणून या तिन्ही जातीला समाजाला पाहिलं जातं या समाजाला केंद्रात ओबीसी. असल्यामुळे राज्यातील घरकुल योजने पासून वंचित ठेवण्याचे काम सरकार जाणून बुजून करत आहे की काय?सरकारने लक्षात ठेवावे आगामी. काळात या समाजाला रस्त्यावर उतरावे लागेल त्याचे परिणाम आगामी. निवडणुकांवर होतील धनगर बंजारा समाज हा महाराष्ट्रातील जवळपास. सर्वच जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहे याचा फटका सरकारला. नक्कीच आम्हाला बसवावा लागेल त्यामुळे तात्काळ हिवाळी अधिवेशनामध्ये या समाजाच्या न्याय हक्काचे व पक्क्या घरापासून आनंदी. राहण्यासाठी जी घरकुल योजना आहे त्या घरकुल योजनेतून केंद्रातील. ओबीसीला वंचित ठेवण्याचे काम केलेला आहे तो विषय तात्काळ मागे घेऊन या समाजाला घरकुल योजनेचा. लाभ देण्यात यावा असे न केल्यास आगामी काळात आम्हाला याबाबत विचार करावा लागेल असेही मुख्यमंत्री कार्यालय उपमुख्यमंत्री कार्यालय यांना दिलेल्या पत्रामध्ये. शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे




मराठ्यांचा ढाण्यावाघ मराठ्यांचा क्रांतीसुर्य मराठा संघर्ष योद्धा अरक्षण लढ्याचे नेतृत्व मा. मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार काजळा ता गेवराई जि बीड येथे दि. १/१२/२०२३ पासुन बेमुदत साखळी उपोषण सुरु एक मराठा लाख मराठा ६ वा दिवस.

# लोकनेत्याच्या भूमिकेतून माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

**राजकारणात यशस्वी व्हायचे असेल तर आधी लोकांसाठी आपले योगदान द्यावे लागते,प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होऊन जनसेवेचे व्रत अंगिकारावे लागत**



**एखाद्या व्यक्तिमत्त्वाला सामर्थ्य, संपन्नता तेव्हाच प्राप्त होते जेव्हा आत्मविश्वास कार्यक्षमता स्मरणशक्ती भाषण व संभाषण कला वेळेचे नियोजन ताण-तणावाचे व्यवस्थापन सकारात्मक दृष्टिकोन ध्येयनिष्ठा प्रयत्नांची पराकाष्ठा अशा अनेक प्रकारच्या मार्गाने हे व्यक्तिमत्व विकासाचे मार्ग सोपे करत असतात प्रगल्भ सर्जनशील आणि विकसनशील व्यक्तिमत्व म्हणजेच व्यक्तिमत्त्व विकास होय,**

**जे जे उत्तम उदात्त उन्नत ते प्रयत्नपूर्वक, श्रद्धापूर्वक, विचारपूर्वक साध्य करण्याचा ध्यास घेऊन आत्मविश्वासाने पुढे जाणारे एक संयमी नेतृत्व म्हणजे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे आहेत आज त्यांचा वाढदिवस त्यानिमित्त त्यांनी पदावर असताना आणि नसतानाही केलेल्या कामाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरत आहे सर्वप्रथम त्यांना वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा**

**राजकारणात यशस्वी व्हायचे असेल तर आधी लोकांसाठी आपले योगदान द्यावे लागते,प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होऊन जनसेवेचे व्रत अंगिकारावे लागते,आपल्याकडे आलेला प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या तरी विवंचनेत असणारा असतो त्याचे प्रश्न सोडवण्यासाठी सदा तत्परता ठेवावी लागते तरच जनतेतून मतदान रुपी आशिर्वाद मिळतात,हल्ली कुणीही उठतो आणि नेतेगिरी करण्याचा प्रयत्न करतो पण जो जनतेशी बांधील राहून राजकारणात राहतो तोच यशस्वी होतो, मा जयदत्त क्षीरसागर एक परिपक्व नेतृत्व म्हणून बीड जिल्ह्यातच नव्हे तर सम्पूर्ण राज्यात,देशात परिचित आहे,आपल्या कार्यकुशलतेतून त्यांनी बीड शहरासाठी जिल्ह्यासाठी आणि मतदार संघासाठी कोट्यवधींचा निधी खेचून आणत विकास कामांचा आपला आलेख उंचावत ठेवला आहे,**

**बीड मतदार संघ आणि जिल्यासाठी मा जयदत्त क्षीरसागर यांनी केलेल्या प्रयत्नामुळे शहरातील जुन्या न्यायालयाजवळच मोठी आणि सुसज्ज व भव्य न्यायालय ईमारत आजही डौलाने उभी आहे,सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग पूर्ण व्हावा यासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला हा महामार्ग झाल्याने बीडमधून जाणारी जड वाहतूक आता बंद झाली असून जालना रोड ते बार्शी नाका हा रस्ता मोकळा स्वास घेत आहे**

ईट येथे अत्याधुनिक गजानन सुत गिरणीची उभारणी केल्याने शेकडो तरुणांना हाताला काम मिळाले आणि शेतकऱ्यांना देखील याचा फायदा होऊ लागला दूध संघामार्फत दुग्धजन्म पदार्थ निर्मिती चालू असून संघाच्या या उत्पादनाला आता मागणी वाढत आहे गवारी येथे विद्युत केंद्राची उभारणी केल्याने त्या भागातील जनतेचा वीज प्रश्न सुटला आहे अनेक गावांना कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजना मंजूर करून आणत तेथे नवीन पाईप लाईनचे काम करून घेतले आहे चिंचपुर-राजुरी १५१ कोटीचा हायवे रस्ता तर राजुरी-खरवंडी हा मुख्य महामार्ग १८० कोटीचा रस्ता असून यामुळे देशाचा पश्चिम भाग जोडला जाणार आहे, खोकरमोहा येथे सब स्टेशन शिरूर का. व फुलसांगवी येथे जि.प.शाळा बांधकाम (सहा कोटी ७५ लक्ष) पूर्वी प्रशासकीय इमारतीत डीपीडिसी हॉल होता पण मा जयदत्त क्षीरसागर यांनी शहरातील डिपीडीसी बिल्डींगची उभारणी करून गैरसोय दूर केली

बीडच्या सरकारी दवाखान्यात नविन २०० खाटांचे स्वतंत्र रूग्णालय व त्याला लगतच आणखी १०० खाटांचे अतिरिक्त रुग्णालय होत आहे त्यामुळे सर्वसामान्य माणसाला आपल्या आरोग्य सुविधा मोफत घेता येतील, समातंर पाणी योजनेअंतर्गत नविन पाईप लाईनचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे,बचत गटाच्या माध्यमातून महिलासाठी प्रशिक्षण व रोजगार निर्मिती बीड शहरासाठी नविन अद्यावत बसस्थानक मंजुर असून याचेही काम आता पूर्ण होत आहे,घनकचरा व्यवस्थापन साठी ९ कोटी तर सुवर्ण जयंती योजनेतून ३५ कोटी रुपये बीडसाठी मिळाले त्यातूनच साठे चौक ते डॉ आंबेडकर पुतळा हा पक्का सिमेंट रस्ता करता आला, शेकडो महिला बचत गटांना गजानन बॅकेतून अर्थ सहाय्य दिले असून आज याच महिला स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहेत हरित क्षेत्र योजनेतून २३ उद्यानांना मंजूरी मिळाली शहरात छोटे छोटे उद्यानाची कामे झाली आहेत बीड शहरात नविन १६ सिमेंट रस्ते (८८ कोटी ),व ११४ कोटींची अमृत अटल योजनेचे काम पूर्ण आहे,भुयारी गटार योजनेचे काम होत असून यासाठी १६३ कोटी मिळाले आहेत, बार्शी नाका पूलाचे काम पूर्ण झाले असून खासबाग ते मोमीनपुरा पूल,जुना बाजार ते कंकालेश्वर पूल या दोन पूलाचे प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल आहेत,

माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी ग्रामीण भागातील अत्यावश्यक असणाऱ्या मागण्या लक्षात घेऊन सर्व कामांचे प्रस्ताव विविध योजनांच्या माध्यमातून तयार केले होते त्यापैकी जवळपास सर्वच कामांना मंजुरी मिळाली आहे ग्रामीण भागातील रस्ते ,बंधाऱ्याची कामे आणि सांस्कृतिक सभागृह अशा कामांना प्राधान्य देण्यात आले होते तसेच पाणीपुरवठा योजनेअंतर्गत कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने भविष्यात लोकसंख्या लक्षात घेऊन या गावचे प्रस्तावदेखील मंजूर करण्यात आले,राज्य शासनाच्या विविध विभागांतर्गत कामांचा यामध्ये समावेश आहे जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत अनेक गावांचा समावेश करण्यात आला ही कामेदेखील तात्काळ झाली, मा जयदत्त क्षीरसागर यांनी मतदार संघातील गावे राज्य रस्ता आणि केंद्रीय रस्त्याला जोडली जावीत यासाठी दाखल करण्यात आलेले प्रस्ताव मंजूर झाल्यामुळे अनेक गावे मुख्य रस्त्याला जोडली जात आहेत शहरासाठी महत्त्वाची ठरणारी अमृत अटल योजना सुरू झाली असून या अंतर्गत अनेक प्रभागात पाईपलाईन रस्ते आणि नाली बांधकामाची कामे पूर्ण केली आहेतशहरातील जवळपास सोळा मुख्य रस्ते कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीटचे झालीआहेत त्यामुळे शहराचा गजबजलेला भाग मोकळा श्वास घेत आहे, याचबरोबर भाविकांची मागणी लक्षात घेऊन काळा हनुमान ठाणा ते खंडेश्वरी देवी मंदिरापर्यंतचा रस्ता कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीटचा व्हावा अशी मागणी करण्यात आली होती हे काम देखील पूर्ण झाले आहे,तसेच खंडेश्वरी देवस्थानच्या विकासासाठी नुकतेच ४ कोटी मंजूर झाले आहेत त्यामुळे येथे मोठ्या सुविधा मिळणार आहेत, यापूर्वी शहराचे ग्रामदैवत असलेल्या खासबाग देवी मंदिराचा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती ती देखील पूर्ण करण्यात आली आहे, याचबरोबर नव्या बीड शहरातून जुन्या बीड शहराला जोडणाऱ्या दोन महत्त्वाच्या पुलांचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत ते देखील लवकरच मंजूर होतील या कामासाठी जवळपास ५ कोटी रुपयाचा निधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दाखल करण्यात आला आहे जुना बाजार ते कंकालेश्वर या दरम्यानचा दगडी पूल आता नव्याने होणार असून यासाठी एक कोटी ८५ लाख रुपये तरतूद आहे त्याचबरोबर मोमिनपुरा ते



खासबाग यासाठी बिंदुसरा नदी वर एक कोटी ३५ लाख रुपये खर्चाचा आणि वीस फूट उंचीचा नवीन पूल बांधण्यात येणार आहे माजी नगराध्यक्ष डॉ भारतभूषण क्षीरसागर यांनी पालिकेच्या माध्यमातून तत्कालीन मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे हे प्रस्ताव दाखल केले होते त्यानुसार पर्यटन मंत्रालयाकडे हे प्रस्ताव पाठवण्यात आले असून याचीही मंजुरी मिळणार आहे ही सर्व कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहेतया व अन्य कामासाठी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जे प्रयत्न केले ते बीडची जनता कधीही विसरू शकत नाही म्हणूनच लोकनेत्याच्या भूमिकेत जयदत्त क्षीरसागर कायम आहेतच हे मान्य करावे लागेल.

**- प्रशांत सुलाखे**

**डॉ बी.आर.आंबेडकरांची पुण्यतिथी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरी केला जातो. परिनिर्वाण हा संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ मृत्यूनंतर मुक्ती किंवा स्वातंत्र्य असा होतो. त्यांनी धर्माचा सखोल अभ्यास केला, बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर ते नंतर बौद्ध नेते आणि गुरू म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या उंचीचा सन्मान करण्यासाठी त्यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरी केली जाते.आंबेडकरांनी समर्पण आणि प्रचंड परिश्रमाने स्वतंत्र भारताची राज्यघटना संविधान सभेत मंजूर करून घेतली याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांची अनेकांनी प्रशंसा केली आहे आणि या कायदेशीर दिव्यांगाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्द सक्षम नाहीत. त्यांनी स्वत:ला केवळ अनुसूचित जातीचे नेते समजू नये, तर राजकरणमध्ये सामील व्हावे आणि त्यांच्या संकुचित समाजाच्या नेतृत्वापेक्षा त्यांच्या हायकमांडमध्ये स्थान मिळवावे, असे म्हटले आहे. अनेक सदस्यांनी आंबेडकरांना 'आधुनिक महापुरुष' म्हणून वर्णन केले आणि त्यांच्या योगदानामुळे त्यांच्याबद्दलचे सर्व गैरसमज आणि शंका दूर झाल्या. देशातील सर्वोच्च देशभक्तांमध्ये त्यांची गणना होते. एस. सहाय म्हणाले: स्वातंत्र्याचे श्रेय महात्माजींना दिले जाईल आणि त्याच्या संहितेची जबाबदारी त्यांच्या कठोर टीकाकारांच्या म्हणजेच आपल्या महान संविधानाचे महान शिल्पकार डॉ. आंबेडकर यांच्या डोक्यावर राहील.**

**त्याने पुढे तो केवळ संस्मरणीयच नाही तर येणाऱ्या पिढ्याही त्याला स्मरणात ठेवतील. मसुदा समितीचे सदस्य अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी आपल्या भाषणाचा समारोप अशा प्रकारे केला – जर मी माझे सहकारी आदरणीय डॉ. आंबेडकर यांच्या कार्यक्षमतेबद्दल आणि क्षमतेबद्दल आदर व्यक्त केला नाही, तर मी स्वतःला माझ्या कर्तव्यापासून दुर्लक्षित समजेन. आंबेडकरांनी ज्या क्षमतेने ते चालवले आणि ज्या परिश्रमाने त्याची रचना केली ते कौतुकास्पद आहे. गोविंद बल्लभ पंतांनी त्यांना 'पंडित' म्हटले आणि म्हटले – त्यांची विद्वत्ता त्यांनी संविधानाचा मसुदा तयार करणे आणि सभागृहात त्यातील तरतुदींचा अर्थ लावणे यावरून दिसून येते. डॉ. पट्टाभी सीतारामय्या म्हणाले – या अद्वितीय आणि तपशीलवार कामात त्यांनी दाखवलेल्या शिष्यवृत्तीकडे मला त्यांचे लक्ष वेधायचे आहे... त्यांनी जे योग्य वाटले ते सांगितले, मग त्याचे परिणाम काहीही असोत. पंडित कुंजरू यांनी हे काम इतक्या कौशल्याने आणि विचारपूर्वक पूर्ण केल्याबद्दल मसुदा समितीचे कौतुक केले.**



डॉ.के.व्ही. राव म्हणाले की, डॉ. आंबेडकर हे संविधानाचे जनक नसून त्यांची माता आहेत. त्यांच्या मते, यासंदर्भात घेतलेल्या निर्णयांमध्ये आंबेडकरांचा कोणताही हात नव्हता, ते त्याची धोरणे ठरवणारेही नव्हते, त्यांना स्वतःशी तडजोड करावी लागली, त्यांना त्यांच्या उद्दिष्टांमध्ये यश आले नाही तर इतरांच्या धोरणांचा पुरस्कार करावा लागला. त्यांनी अध्यक्षीय कार्यकारिणीची पुष्टी केली होती, पण नंतर त्यांनाच संविधान सभेत या व्यवस्थेला विरोध करावा लागला. डॉ.के.व्ही. राय पुढे म्हणाले की, नेहरू आणि पटेल यांना राष्ट्रपिता म्हणता येईल पण मी त्यांना मुख्य देवता म्हणणे पसंत करेन जे संविधानाचे खरे जनक होते. आंबेडकरांना संविधानाची जननी म्हणता येईल.

डॉ. पीली यांनी त्यांच्या पुस्तकात त्यांना एक घटनाकार म्हणून अशाप्रकारे पाहिले की, आंबेडकरांनी त्यांचे कार्य उत्कृष्टता, पांडित्य, विद्वत्ता, कल्पनाशक्ती, तर्कशास्त्र आणि अनुभव यांच्या आधारे केले. जेव्हा जेव्हा ते मसुद्यातील तरतुदींवर टीकेला उत्तर देण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी त्या मांडणींचे इतके ठोस आणि स्पष्ट स्पष्टीकरण दिले की गैरसमज दूर झाल्यासारखे वाटले. त्यांच्या जातींवरील ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी त्यांचे शिक्षक जॉन ड्यूई यांचा उल्लेख केला ज्यांच्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. भारतातील जवळपास सर्व विचारवंत आणि नेते इंग्लंडच्या उदारमतवादी विचारसरणीने प्रभावित होते, परंतु डॉ. आंबेडकर हे एकमेव नेते होते ज्यांचे प्रेरणास्थान अमेरिका होती. त्याने स्वतःला जॉन ड्यूईचे ऋणी असे वर्णन केले आहे. जॉन ड्यूईचे तत्वज्ञान वास्तववादावर आधारित आहे. ते तत्त्वांना नव्हे तर निकालाला महत्त्व देतात. अनुभवातूनच वास्तव समोर येते. हे एक आशावादी तत्वज्ञान आहे.

आंबेडकर हे प्रख्यात विद्वान, एक प्रतिष्ठित शिक्षणतज्ञ, एक कुशल राजकारणी, एक प्रभावी वक्ते, एक धैर्यवान उपदेशक, एक प्रामाणिक घटनाकार, एक सक्षम प्रशासक, क्रांतिकारी बदलांचे प्रसिद्ध पुरस्कर्ते आणि दलितांचे निर्भीड पुरस्कर्ते होते. आंबेडकरांच्या स्वभावात संस्कृती, शहाणपण, व्यंगचित्र, माणुसकी, विवेकवाद, विवेकवाद, विषमतेविरुद्धचा राग आणि अन्याय, अंधश्रद्धेविरुद्धचा राग यांचा योग्य तोल होता. त्यांची प्रतिभा बहुमुखी होती. गांधीजी त्यांना निर्भय म्हणायचे. डॉ. आंबेडकरांनी धर्मग्रंथातील ते भाग उद्धृत केले ज्याद्वारे समाजाच्या उच्च पदावर बसलेल्या लोकांनी असे दुष्ट वर्तुळ सुरू केले की भेदभाव हा आपल्या धर्माचा भाग बनला आणि त्यामुळे समाजातील एक मोठा वर्ग शोषणाच्या खाईत ढकलला गेला.

स्वातंत्र्यलढ्यात अस्पृश्यांचे सामाजिक स्वातंत्र्यही महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले होते. जोपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक आपल्या कपाळावरून हटत नाही तोपर्यंत स्वराज्य निरुपयोगी आहे, असे गांधीजी म्हणाले होते. त्यानंतर राष्ट्रीय चळवळही याच आधारावर सुरू झाली. डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्यांचे संघटन केले. त्यांना माणसाचा दर्जा देऊन भारतीय समाज आणि राजकारणात स्थान दिले. त्यांच्या नेतृत्वाचा परिणाम म्हणून, एक शिक्षित वर्ग उदयास आला आणि सरकारी सेवांमध्ये गुंतला, जरी याला मर्यादा होत्या. त्यांच्या मते, लोकशाहीतील अस्पृश्यांचे राजकीय शत्रू ब्राह्मण (जरी ते ब्राह्मणविरोधी होते) नसून शक्तिशाली कृषी जाती आहेत. त्यांनी महारावतन संपवण्याचा आग्रह धरला आणि जमीनदारी व्यवस्था मोडून काढण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांच्या राहिलेल्या आठवणींमध्ये तीन संस्था अतिशय महत्त्वाच्या आहेत – (१) पीपल्स एज्युकेशन सोसायटी, १९४५ आणि तिची महाविद्यालये, (२) बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, १९५३ आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (त्यांच्या तत्त्वांवर आधारित). मृत्यूनंतर तयार केलेले). सुरक्षित ठिकाणे रद्द करावीत असे त्याला वाटले. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी अनुसूचित जाती महासंघ आणि समाजवादी यांच्याशी करार केला. परंतु समाजवाद्यांनी अनुसूचित जाती महासंघाच्या उमेदवारांना मतदान केले नाही. त्यांच्या राजकीय पक्षाची श्रद्धा त्यांच्या जातीपुरती मर्यादित होती. कामगार नेता होण्यापेक्षा आपण आपल्या समाजाचे नेते बनू, असे त्यांनी क्रिप्ससमोर सांगितले होते. त्यांनी प्रगणित जातींसाठी काय केले आहे त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे मूल्यमापन केले. भारतीय लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या केंद्रीकृत सरकारच्या स्थापनेसाठी त्यांनी लढा दिला. संविधानाचा मसुदा संविधान सभेत मंजूर करून घेण्याची त्यांनी विलक्षण क्षमता दाखवली. पण नंतरच्या काही घटनांमुळे ते हताश झाले आणि त्यांना म्हणावे लागले – राज्यघटनेचा मसुदा तयार करताना मी भाड्याचा पोनी होतो. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांचा पूर्ण पराभव झाल्याने ते खूप निराश झाले होते. आंबेडकरांचा विशेष राजकीय प्रभाव नसला तरी त्यांच्या विचारांचा आदर केला जातो, असा सर्वसाधारण समज होता. या प्रश्नाचे उत्तर अजूनही सापडलेले नाही की त्यांनी स्वत:ला कामगार नेता का नाही म्हणवून घेतले? आंबेडकरांचा स्वभाव उदारमतवादी होता. त्यांनी संसदीय लोकशाही आणि राज्य समाजवाद यावर भर दिला.

आंबेडकरांनी एक निर्भय विचारवंत असण्याबरोबरच ते एक उत्तम राजकारणीही होते हे सिद्ध केले. त्यांनी भारतीय राजकारणाला संकुचित वृत्ती, परंपरावाद आणि धर्मवादापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी देशाला कायदेशीर चौकट उपलब्ध करून दिली आणि लोकांना स्वातंत्र्याचा आधार दिला. त्यांचे नाव देशाच्या सामाजिक-राजकीय इतिहासात आणि भारतातील ब्रिटीश राजवटीच्या शेवटच्या काळात, जेव्हा भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक बनणार होता तेव्हा राज्यघटनेच्या विकासामध्ये ठळकपणे नोंदवले जाईल. एक राजकारणी म्हणून त्यांची भूमिका आणि बौद्धिक योगदान भारतीय राजकारणाच्या इतिहासात सदैव अमर राहील. त्यांनी महत्त्वाच्या राजकीय निर्णयांमध्ये भाग घेतला आणि संविधानाचा मसुदा तयार करताना त्यांची रचनात्मक राजकीय क्षमता उत्स्फूर्तपणे बहरली. आंबेडकरांनी भाऊराव गायकवाड यांना महारावतन विधेयकाबाबतचा त्यांचा संघर्ष पुढे ढकलण्यास सांगितले कारण त्यांना वाटले की ते उच्चवर्णीय लोकांचा राग येईल. या संघर्षात महारांच्या हिताचे नुकसान होणार असल्याचे ते म्हणाले. विनाकारण तुरुंग भरून काही फायदा नाही, असे त्यांचे मत होते. त्यांनी आपल्या अनुयायांना सत्याग्रहाचा मार्ग सोडण्यास सांगितले. अस्पृश्यांच्या मागण्या सरकारपुढे मांडाव्यात आणि या आंदोलनाला सामूहिक सत्याग्रहाचे स्वरूप देऊ नये, असे ते म्हणाले. कायद्याच्या राजवटीत क्रांतीच्या रक्तरंजित पद्धती अवांछितच नाहीत, तर सविनय कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रहही अनिष्ट आहेत, असे त्यांचे मत होते. आंबेडकरांना पाश्चिमात्य शिक्षण मिळाले असले तरी ते नेहरूंसारखे पाश्चिमात्य समर्थक नव्हते. त्यांनी घोषित केले की अस्पृश्यांचे दोन शत्रू आहेत: ब्राह्मण आणि भांडवलशाही, परंतु त्यांच्याशी लढण्याचा त्यांचा मार्ग काय होता. केवळ संसदीय मार्गांचा अवलंब करूनच नव्हे तर इतर समविचारी पक्षांच्या सहकार्याने वर्गयुद्ध करणे. ही त्यांच्या राजकीय विचारसरणीची सर्वात मोठी कमजोरी होती.

डॉ.जाटव यांनी आंबेडकरांच्या विचारांचा सामाजिक मानवतावाद असे वर्णन केले. यामध्ये पुढील तत्त्वांचा समावेश होता:

(१) मानवजातीची समानता,

(२) प्रत्येक मानव एक एकक म्हणून,

(३) प्रत्येक मानवाला सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार,

(४) प्रत्येक मानवाला मुक्तता. वंचितता आणि भीती. (५) स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि माणसाकडून होणारे अत्याचार आणि शोषण बंद करणे, वर्गानुसार वर्ग आणि राष्ट्रानुसार राष्ट्र,(६) संसदीय प्रणालीवर आधारित शासनाच्या अंतर्गत लोकशाही समाजाची स्थापना, (७) समाजसुधारणेतील अहिंसेचा मार्ग आणि वर्गसंघर्ष किंवा गृहयुद्ध टाळण्यासाठी मन वळवण्याची पद्धत, (८) कोणत्याही 'इझम' सिद्धांतावर टोकाचा विश्वास टाळणे,(९) आध्यात्मिक शिस्तीची गरज आणि(१०) प्रेम. जग, समता आणि बंधुत्वाची स्थापना, ज्याचा उद्देश बुद्धाने दिला होता.आंबेडकरांच्या राजकीय विचारसरणीची तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत: राष्ट्रवादाच्या व्यावहारिक शक्तींची ओळख, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या आधारे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मुक्तीसाठी धार्मिक युद्ध, राजकीय, सामाजिक, आर्थिक किंवा धार्मिक साम्राज्यवादाच्या कोणत्याही स्वरूपाचा विरोध. , केवळ संवैधानिक पद्धतींचा वापर, हिंसाचाराचा त्याग, न्याय आणि शांततेचे प्रेम, लोकशाही गतिशीलतेकडे कल, मानवतावाद ज्यानुसार माणूस सभ्यता आणि संस्कृतीचा निर्माता मानला जातो आणि प्रेमाच्या आधारावर प्रगतीची क्षमता मानली जाते. नंतर, आंबेडकरांनी स्वतंत्र मतदानाची मागणी सोडून देणे आणि राष्ट्रीय नेतृत्वाशी तडजोड करणे या महत्त्वाच्या गोष्टी होत्या.

डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील जनतेने संस्कृतीकरणाऐवजी पाश्चात्यीकरणाचा मार्ग स्वीकारला. अंतर्गत जातीय सुधारणा, जात वर्गातील नेतृत्वावर भर, राजकीय मागण्या, पौराणिक धर्म नाकारणे इत्यादींनी त्यांच्या चळवळीला निश्चित दिशा दिली. अलिप्ततावादी घटक पूर्वीही अस्तित्वात होते आणि आजही आहेत, परंतु ते एकता घटकांच्या मदतीने नियंत्रित केले जाऊ शकतात. स्वतंत्र भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांच्या रक्षणासाठी राजकीय संरक्षणाबाबत त्यांनी गोलमेज परिषदेत एक कार्यक्रम मांडला होता. त्यांनी मागणी केली: (१) अस्पृश्यता बेकायदेशीर मानून समान नागरिकत्व आणि मूलभूत हक्क, (२) योग्य घटनात्मक तरतुदीसह समान हक्कांचा मुक्त वापर, (३) भेदभावापासून संरक्षण, (४) अनुसूचित जातींना विधिमंडळात योग्य प्रतिनिधित्व, स्वतंत्र मतदान आणि प्रौढ या वर्गांसाठी दहा वर्षांसाठी हक्क, (५) सेवांमध्ये योग्य प्रतिनिधित्व, (६) पूर्वग्रह आणि दुर्लक्षापासून संरक्षण, शिक्षण सुविधा इ., (७) विशेष विभागीय काळजी, विशेष मंत्री आणि कल्याण ब्युरो, आणि (८) स्थान भावी मंत्रिमंडळ. जर आपण वरील मागण्यांचे विश्लेषण केले तर आपल्याला असे दिसून येईल की त्या सर्वांची अंमलबजावणी होत आहे, ज्याचे श्रेय आंबेडकरांना आहे आणि भारतीय राष्ट्रवादाच्या प्रगतीशील लोकशाही स्वरूपाचे आहे. एप्रिल १९३१ मध्ये कराची काँग्रेसच्या अधिवेशनात मूलभूत हक्कांबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला. गांधीजींनी त्यांच्या राष्ट्रीय चळवळीत अस्पृश्यता निर्मूलन कार्यक्रमाचा समावेश केला. ते १९२० मध्ये म्हणाले होते, 'हा डाग धुतल्याशिवाय स्वराज्य निरर्थक आहे.

भारतात सामाजिक आदर्शवाद आणि राजकीय आदर्शवाद हे एकमेकांचे विरोधक राहिले आहेत. बहुसंख्यांचा राजकीय आदर्शवाद हा सर्वांचा सामाजिक आदर्शवाद बनेल हे आंबेडकरांना समजले. त्यांचा स्वत:च्या समाजावरील विश्वास त्यांच्या अखिल भारतीय नेतृत्वावर दिसून येतो. त्यांनी स्वातंत्र्यापेक्षा आपल्या वर्गाच्या स्वातंत्र्याला आणि कल्याणाला अधिक महत्त्व दिले. पण स्वराज्याची प्रगती जवळ आल्यावर त्यांनी राष्ट्रीय नेतृत्वाशी तडजोड केली. त्यांनी राजकारणावर वर्चस्व गाजवले नाही पण त्यांनी महत्त्वाच्या निर्णयांना नवी दिशा दिली.ते आपल्या समाजाचे नेते असले तरी त्यांनी भारतीय राजकारण धर्मनिरपेक्ष करण्याचा प्रयत्न केला. भारतीय राजकारणाला धर्मनिरपेक्षतेकडे नेणारे घटक हे होते: पाश्चात्य प्रभाव, कायद्याचे राज्य, नागरिकांसाठी समानता, कायदा आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये राजकारण्यांचे सहकार्य, राजा राममोहन रॉय, रानडे, फुले, आगरकर आणि इतर

समाजसुधारकांच्या व्यापक चळवळी, लोकशाही उदारमतवाद आणि प्रौढ मताधिकार. भारतीय राज्यघटनेची भूमिका हे याचे अभूतपूर्व उदाहरण आहे. डॉ.आंबेडकर हे देखील वरील विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रीय अखंडता हा ज्वलंत प्रश्न होता. शिक्षण, आर्थिक विकास, तर्कशुद्ध दृष्टिकोन, आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक-आर्थिक कार्यक्रमांचे धर्मनिरपेक्ष स्वरूप आणि घटनात्मक उद्दिष्टे हे काही घटक होते ज्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतीय राष्ट्रीय जीवनाला नवसंजीवनी दिली. त्यांच्या सर्जनशील राजकीय कौशल्याने डॉ. आंबेडकरांना राष्ट्रनिर्मात्यांच्या यादीत स्थान मिळवून दिले. आणि इ.स. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरानंतर काही महिन्यांनीच त्यांचे निधन झाले. इ.स. १९९० मध्ये, त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात केला.


**लेखक :– ॲड रविंद्र लक्ष्मण काटकर**
( जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय
मो नंबर:– ८३०८१५२७०५




सर्वांना सप्रेम जय भीम कॅण्डल मार्च अभिवादन रॅली

दिनांक ०६/डिसेंबर वार बुधवारी महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६७ वा महापरिनिर्वाण दीना निम्मित व बलभीम नगर बुद्ध विहाराच्या स्लॅब (छता चे ) काम सुरु करण्या पूर्वी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे नगर सेवक विनोद मुळूक यांच्या हस्ते पूजन करून महामानवास अभिवादन करण्यात आले आणि सायंकाळी ०६:०० वाजता दिलीप नगर येथून बलभीम नगर बुद्ध विहार पर्यंत प्रत्येकाने हाताय मेणबत्ती घेऊन कॅण्डल मार्च रॅली काढ्यात आली या कॅण्डल रॅलीत महिला पुरुष लहान मुले मोठया संख्येने उपस्थित होऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले आहे या रॅली साठी भारतीय बोद्ध महसभा व समतासैनिक दलाचे सदस्या सह बलभीम नगर, दिलीप नगर, शिवाजी नगर, पंचशील नगर येथील बांधव रॅली मध्ये सहभागी होऊन बाबासाहेब यांना महापारीनिर्वाण दिनानिमित्त शिवाजीनगर येथील बलभीम नगर बिद्ध विहार परिसरात मेणबत्ती लावून अभिवादन करण्यात आले

कॅण्डक मार्च रॅली चे आयोजन ::–ॲड तेजस वडमारे, गौतम खेमाडे, सचिन वघमारे, अजय जाधव, अनिल अंकुटे सिद्धार्थ विद्यागर, राजू धन्वे, दिलीप गवळी, निवृत्ती वाघमारे व अंजली तेजस वडमारे, सुशीला साळवे बलभीम नगर महिला मंडळ व मित्र मंडळ बीड.




**टाकरवन ।वचिष्टआठवे**

**माजलगाव तालुक्यतिल हिवरा (बु) जि.प.प्रा.शाळा येथे सहा डिसेंबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६७ व्या महापरिनिर्वाण दिन या दिनानिमित्त शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष लहू(भैया) अवघडे यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली आणि त्यांना विनम्र अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याचे आदर्श घेऊन पुढे वाटचाल केली पाहिजे असे मत आगे.सर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मा. मुख्यध्यापक.दुधाळ सर, सहशिक्षक.लोकरे.सर, तोडकर.सर व सर्व शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.**


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT